# प्रेस नोट

## दुकानाचे शटर उचकटुन घरफोडया करणारी तेलंगणामधील आंतरराज्यीय टोळी गजाआड
## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सिंधुदुर्ग यांची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांच्या आदेश व मार्गदर्शना प्रमाणे,जिल्हयांत मालमत्तेच्या गुन्हयांचे अनुषंगाने घडणा-या गुन्हयांना आळा घालण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री प्रल्हाद पाटील स्थागुअशा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री.रविराज फडणीस स्थागुअशा सिंधुदुर्ग व श्री.देसाई, तसेच स्थागुअशा मधील सपाफौ/३५९ आंबेरकर,पोना/१६७ केसरकर,पोना/११८ वालावलकर,पोना/४० राणे,पोना/१२ तांबे,पोकॉ/७१६ जाधव पोकॉ/४३ पाटील असे रात्री कसाल येथे जाऊन तेथील एस.टी.स्टॅन्ड व तेथील परिसर चेक करुन परत मुंबई गोवा हायवेने ओरोस फाटा येथे आले. असता तेथे साईडला गाडी थांबवुन तेथील परिसराची पहाणी करीत असताना ओरोस बाजारपेठ मध्ये असलेल्या दुकानांचे शेडच्या बाजुला चार लोक संशयास्पद वावरत असताना दिसुन आले. म्हणुन त्यांना जागीच पकडुन त्यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी त्याच्या नावगावाबाबत संशयास्पद उत्तरे देवु लागले म्हणुन त्यांचेकडील सामानाची खात्री केली असता त्यामध्ये दोन स्क्रु ड्रायव्हर,दोन कटावणी असे साहीत्य मिळून आले.म्हणुन त्याचे कडे सखोल चौकशी करता त्यांनी सदर साहीत्याचा वापर करुन काल दि.२७/०९/२०१८ रोजी रात्री रत्नागिरी येथे तीन दुकानांचे शटर उचकटुन चोरी करुन आल्याचे सांगितले. तसेच त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत असे निष्पन्न झाले की, त्यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारचे कर्नाटक व तेलंगणा येथे चो-या केल्याचे तसेच सदर आरोपीत हे मागील दोन वर्षे हैद्राबाद जेलमध्ये असल्याचे सांगितले. सदर वेळी त्यांनी आपली नावे १)सुरेश नायक नारायण रेक्युला वय-४६ रा-बल्लारी व्हीलेज,ता-सुल्ला जि-मंगळुर राज्य-कर्नाटक २)शंकर आप्पाराव सिम्मा वय-४३ रा- अंसी गार्डन कोंडवारी स्टेट ऐदीपल्ली मार्केट घर नं.२-८-१३/१ ता-राजमहेंद्रवरम जिल्हा-ईस्ट गोदावरी राज्य-आंध्रप्रदेश ३)रवि सुबाराव रेगुला उर्फ लंबु रवि वय-५२ रा- संतेबिदनुर ता-हिंन्दुपुर जि-अनंतपुर राज्य-आंध्रप्रदेश ४)मंजुनाथ रविकुमार कुरबा वय-४५ रा-शुमुगा,विनोबानगर ६ क्रॉस पोलीस स्टेशन-विनोबानगर राज्य-कर्नाटक अशी सांगितली. त्यापैकी सुरेश नायक नारायण रेक्युला रा-बल्लारी व्हीलेज,ता-सुल्ला जि-मंगळुर राज्य-कर्नाटक याच्या ताब्यात घरफोडी करण्याचे साहित्य तसेच रोख रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे सदर आरोपीत यांचेविरुध्द सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि नं ४७/२०१८ भादवि कलम ४०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर आरोपीत यांना दिनांक ०४/१०/२०१८ पर्यत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आलेली आहे.

सदर आरोपीत यांनी तेलंगना ,आंध्रप्रदेश,कर्नाटक, महाराष्ट्र, गोवा या राज्यांत बरेच गुन्हे केल्याचे तपासात सांगत असत असुन त्याबाबत अधीक तपास सुरु आहे.

सदर कारवाई बाबत मा. मा. पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांनी सदर टिमचे अभिनंदन केले आहे.

पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग